सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०२ | मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. प्रसाद भंडारी
पुरोहित



श्री. पंकज चौधरी
नगरसेवक



श्री. सुनील शिंपी
अमळनेर



श्री. दीपक पानसे
अमळनेर



श्री. बाळा पवार
माजी नगरसेवक



श्री. राहुल ठाकूर
अमळनेर



श्री. गणेश धनगर
अमळनेर



श्री. जगदीश महाले
शिक्षक

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती पुस्तके लिहिली?

–पान २ वर

# डंपरच्या वाहतुकीचा कहर थांबेचना...!

## चक्क प्रांत कार्यालयासमोर धडकेतील 'त्या' जखमीचा उपचारावेळी मृत्यू; नागरिक संतप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातून जाणाऱ्या चोपडा-धुळे मार्गावरील डंपरची वाहतुकीने अक्षरशः कहर माजवला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी याच रस्त्यावर तीन जणांना चिरडल्याची घटना ताजी असताना आणखी एका निष्पाप जीवाचा चौथा बळी गेला आहे. चक्क प्रांताधिकारी कार्यालयासमोरील मुख्य चौकात रविवार, दि. १२ एप्रिल रोजी भरधाव डंपरने धडक दिल्याने अब्दुल शेख (वय ६५, रा. जोशीपुरा) हे जखमी झाले होते. आज सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरवासीयांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.



मृत अब्दुल शेख

याबाबतची माहिती अशी, की येथील प्रांताधिकारी कार्यालय व बळीराजा स्मारकासमोरील चौकात वाळूच्या डंपरने (एमएच ४१- ८४६४) काल सायंकाळी जोरदार अब्दुल शेख यांना जोरदार धडक दिली होती. गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. प्रांताधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय आणि बळीराजा स्मारक परिसरानजीक दिवसभर नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. याच मार्गावरून शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा ठिकाणी अवजड वाहतुकीची वाहने भरधाव जात असतात. तसेच क्षमतेपेक्षा अधिक वाळू घेऊन जाणारे विना नंबरचे डंपरही सुसाट असतात. मात्र, याबाबत कोणालाही सोयरसुतक नाही.

याच विषयावर अलीकडेच दै. 'ग्लोबल महातेज'ने वृत्तही प्रसिद्ध केले होते. मात्र, डंपर वाहतुकीचा कहर थांबायलाच तयार नाही, असे शहरात चित्र आहे. त्यामुळे या सुसाट डंपर वाहतुकीस नेमके कोणाचे अभय आहे? असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, प्रशासनही याबाबत अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे.

### सुसाट डंपर वाहतुकीमागे अवैध तस्करीचा संशय

सुसाट व विना क्रमांकाच्या क्षमतेपेक्षा अधिक डंपरमधून वाळू वाहतुकीमागे अवैधरीत्या तस्करीचा नागरिकांकडून संशय व्यक्त केला जात असून, वाहतूक नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचे चित्र शहरात दिसत आहे. मात्र, यावर प्रशासनाकडून कारवाईच होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा प्रकार म्हणजे नियमभंग आहे की संगनमत? असाही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातून जड वाहनांना बंदी, पर्यायी (बायपास) मार्गाची व्यवस्था तसेच अवैध डंपरवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.



*अमळनेर : प्रांत कार्यालयासमोर रविवार, दि. १२ एप्रिल रोजी डंपरच्या धडकेत अब्दुल शेख जखमी झाल्यानंतर परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने केलेली गर्दी.*



*अमळनेर : जळगाव येथील रिंग रोड परिसरातील रहिवासी तसेच जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुकुंदराव सपकाळे यांच्यावर झालेल्या हल्ल्याची चौकशीसह हल्लेखोरास तत्काळ अटक व्हावी, या मागणीसाठी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या प्रतिनिधींना निवेदन देताना येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा. अशोक पवार, गौतम मोरे, प्रा. सुभाष पाटील, बन्सीलाल भागवत, अशोक बिऱ्हाडे, बाळासाहेब संदानशिव, अतुल डोळस, हृदयनाथ मोरे, पुरुषोत्तम माळी, महादू बैसाणे, अरुण देशमुख, चंद्रकांत बिऱ्हाडे, आत्माराम अहिरे, समाधान मैराळे (पत्रकार) आदी.*

# सपकाळेंवर हल्ल्याची चौकशीसह हल्लेखोरास तत्काळ अटक करा

## अमळनेरकर संतप्त सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव येथील रिंग रोड परिसरातील रहिवासी तसेच जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुकुंदराव सपकाळे यांच्यावर शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी नुकताच प्राणघातक हल्ला झाला. तसेच याप्रसंगी हल्लेखोरांच्या गटाकडून दगडफेक करीत वाहनांची तोडफोडही करण्यात आली.

त्यामुळे जळगावात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या प्राणघातक हल्ल्याचा येथील विविध सामाजिक कार्यकर्त्यांकडून सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी तीव्र निषेध करण्यात आला. तसेच प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या प्रतिनिधींना निवेदन देण्यात आले.

मुकुंदराव सपकाळे हे सामाजिक कार्यात सक्रिय असून, गोरगरीब जनतेसाठी नेहमीच सेवा भावनेने कार्य करत असतात. अशा माणुसकी जपणाऱ्या व्यक्तीवर भरदिवसा झालेल्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. ही घटना म्हणजे कायदा व सुव्यवस्थेला मारकच म्हणावी लागेल. त्यामुळे या घटनेतील हल्लेखोरांची पोलिसांनी कसून चौकशी करून तत्काळ अटक करावी व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करीत भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देताना प्रा. अशोक पवार, गौतम मोरे, प्रा. सुभाष पाटील, बन्सीलाल भागवत, अशोक बिऱ्हाडे, बाळासाहेब संदानशिव, अतुल डोळस, हृदयनाथ मोरे, पुरुषोत्तम माळी, महादू बैसाणे, अरुण देशमुख, चंद्रकांत बिऱ्हाडे, आत्माराम अहिरे, समाधान मैराळे (पत्रकार) आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



# सोन्याच्या दरात मोठी घसरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सराफ बाजारातील सोने, चांदीचे आज सोमवार, दि. १३ एप्रिल रोजीचे दर हे सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडणारे आहेत. कारण सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम सराफ बाजारावर देखील होताना दिसून आला. आता या युद्धाला विराम लागल्यानंतर सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. जळगाव येथील सराफ बाजारात आज सोन्या आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली. यामध्ये सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम एक हजार, तर चांदीच्या दरात प्रतिकिलो चार हजार रुपयांची घसरण झाल्याचे चित्र आहे. १० ग्रॅम सोन्यासाठी जीएसटीसह एक लाख ५४ हजार ५०० रुपये मोजावे लागले; तर एक किलो चांदीसाठी २ लाख ४८ हजार २३० रुपये मोजावे लागले.

# अमळनेरमध्ये घरफोड्या वाढल्या; बंद घरातून रोकड, दागिने लंपास

## पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यात जवळपास दोन वर्षांपासून चोरी, घरफोडी, विनयभंग, बलात्कार, दोन गटांतील भांडणे आदी थांबल्याचे चित्र शहरवासीयांनी अनुभवले. मात्र, अलीकडच्या काही दिवसांपासून शहरासह तालुक्यात गुन्हेगारांनी पुन्हा डोके वर काढले असल्याचे दिसून येत आहे. शहरातील पिंपळे रस्त्यावरील समर्थ नगरमधील श्रीरंग कॉलनी येथे रविवार, दि. १२ एप्रिल रोजी बंद घराचा फायदा घेत चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे सव्वालाख रुपये रोख रक्कम व किरकोळ दागिने लंपास केल्याची उघडकीस आले आहे. त्यामुळे या कॉलनी परिसरासह शहरातीव विविध भागांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की श्रीरंग कॉलनीतील प्रकाश सुकलाल विसपुते हे कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. या संधीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटे उघडून साहित्य अस्ताव्यस्त करीत त्यांनी मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. यामध्ये चोरट्यांनी ५ ग्रॅमचे कानातले, १०० ग्रॅम वजनाचा चांदीचा गणपती आणि रोख एक लाख २५ हजार रुपये असा सुमारे सव्वालाख रुपयांचा ऐवज लांबविल्याचे विसपुते यांनी सांगितले.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळ गाठले. उपनिरीक्षक शरद काकळीज तसेच कर्मचारी मिलिंद सोनार आणि गणेश पाटील यांनी या घटनेचा पंचनामा केला. त्यानंतर चोरट्यांचा शोध घेण्यासंदर्भात पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली आहे. मात्र, या घटनेमुळे श्रीरंग कॉलनीसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, नागरिकांनी बाहेरगावी अधिक दिवस जायचे असल्यास पोलिसांना तशी माहिती देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



*अमळनेर : शहरातील श्रीरंग कॉलनीतील बंद घरातील चोरीवेळी चोरट्यांनी फोडलेले कपाट.*

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत बदल

## आठ तासांत मदतीचा निर्णय; रुग्णालयेच कागदपत्रे अपलोड करणार; नातेवाईकांची धावपळ थांबणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत आता मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रुग्णांना अथवा त्यांच्या नातेवाईकांना मंत्रालयात चकरा मारण्याची अजिबात गरज उरणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही नवी डिजिटल प्रणाली सुरू आलेली आहे.

यापूर्वी रुग्णांना स्वतः अर्ज करावा लागत होता. मात्र आता संबंधित रुग्णालयांकडूनच रुग्णाची सर्व कागदपत्रे पोर्टलवर अपलोड केली जाणार आहेत. प्रत्येक रुग्णालयाला स्वतंत्र लॉगिन आणि पासवर्ड देण्यात येणार असून, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल. महत्त्वाची बाब म्हणजे अर्ज अपलोड केल्यानंतर अवघ्या ३ ते ८ कार्यालयीन तासांत मदतीचा निर्णय रुग्णालय आणि नातेवाईकांना कळविला जाणार आहे. कागदपत्रे उशिरा अपलोड झाल्यास दुसऱ्या दिवशी निर्णय दिला जाईल. मंजूर रकमेपैकी सुरूवातीला ३० टक्के रक्कम देण्यात येईल, तर उर्वरित रक्कम रुग्णाला डिस्चार्ज मिळाल्यानंतर दिली जाईल. दरम्यान, २०२५ मध्ये या निधीतून तब्बल ४० हजारांहून अधिक रुग्णांना सुमारे ३३३ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे.

कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून ही मदत आणखी वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांसाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि भारत पेट्रोलियम यांच्यासोबत त्रिपक्षीय करार करण्यात आला असून, या माध्यमातून अशा मुलांना मोफत उपचार मिळणार आहेत. नवीन ऑनलाईन पोर्टल ७ एप्रिल २०२६ पासून कार्यान्वित करण्यात आले असून, जुनी पद्धत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाचे स्वागत करत, सर्वसामान्य रुग्णांसाठी ही योजना अधिक सुलभ आणि जीवनदायी ठरणार असल्याचे म्हटले आहे.




### जलद आणि सुलभ मदत

मुख्यमंत्री सहाय्यता निधीची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. अर्ज रुग्णालयांकडूनच अपलोड होणार असून, रुग्णांची धावपळ थांबणार आहे. अर्जानंतर ३ ते ८ तासांत मदतीचा निर्णय कळविला जाणार आहे, तर मंजूर रक्कम टप्प्या-टप्प्याने दिली जाणार आहे. नवीन पोर्टल ७ एप्रिलपासून सुरू झाले असून, जुनी पद्धत बंद करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांना जलद आणि सुलभ मदत मिळणार आहे.

## संपादकीय

# अडथळ्यांतील महासत्ता कूटनीती

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव सध्या काही नवीन नाही. पण अलीकडे तब्बल २१ तास चाललेली चर्चा निष्फळ ठरली, ही बाब जागतिक राजकारणातील वाढत्या गुंतागुंतीचे द्योतक आहे. पाकिस्तानमध्ये झालेल्या या चर्चेत दोन्ही देशांनी एकमेकांसमोर अशा अटी ठेवल्या, की संवादाचा मार्गच बंद झाला. परिणामी, अमेरिकेचे शिष्टमंडळ चर्चा अर्धवट सोडून मायदेशी परतले आणि जगभर पुन्हा एकदा अस्थिरतेची छाया गडद झाली. या चर्चेचा केंद्रबिंदू होता अणुऊर्जा कार्यक्रम. अमेरिकेने इराणला युरेनियम संवर्धन पूर्णपणे थांबविण्याची अट घातली, तसेच देशातील मोठा साठा हटविण्याची मागणी केली. मात्र, ही अट इराणच्या स्वाभिमानाला धक्का देणारी ठरली. इराणसाठी अणुऊर्जा कार्यक्रम हा केवळ तांत्रिक विषय नसून, तो त्यांच्या आत्मसन्मानाचा आणि स्वावलंबनाचा भाग आहे. त्यामुळे अशा अटी स्वीकारणे म्हणजे स्वतःच्या भूमिकेला हरताळ फासणे, अशी भावना तेथे निर्माण झाली. दुसरीकडे अमेरिकेची भूमिका देखील पूर्णपणे चुकीची म्हणता येणार नाही. मध्यपूर्वेत संतुलन राखणे आणि अण्वस्त्रांचा प्रसार रोखणे हा त्यांचा उद्देश आहे. मात्र, त्यांच्या धोरणात अनेकदा दुहेरी निकष दिसून येतात. काही देशांना मोकळीक आणि काहींवर निर्बंध ही भूमिका दीर्घकाळ टिकणारी नाही. त्यामुळेच इराणने अमेरिकेच्या अटींना ठाम नकार दिला. या चर्चेत होर्मुझ सामुद्रधुनीचाही मुद्दा तितकाच महत्त्वाचा ठरला. जगातील तेल वाहतुकीचा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने त्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न दोन्ही बाजूंनी दिसतो.

अमेरिकेला या मार्गाची सुरक्षा आपल्या अटींवर हवी आहे, तर इराण त्याला ठाम विरोध करत आहे. कारण या मार्गावर नियंत्रण म्हणजे आर्थिक आणि सामरिक वर्चस्वाचे प्रतीक आहे. चर्चा अपयशी ठरल्यानंतर अमेरिकेने समुद्रातील स्फोटके हटविण्याची मोहीम सुरू केल्याची बातमी समोर आली आहे.

हे पाऊल संरक्षणात्मक आहे की दबाव टाकण्याचा प्रयत्न, याबाबत मतभेद असले तरी त्यातून तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी छोटीशी ठिणगीही मोठ्या आगीचे रूप धारण करू शकते. या सर्व घडामोडींमध्ये पाकिस्तानने मध्यस्थीची भूमिका पार पाडण्याचा प्रयत्न केला. दोन्ही देशांना चर्चेच्या टेबलावर ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद असला, तरी जेव्हा महासत्ता आपल्या भूमिकांवर ठाम असतात तेव्हा तिसऱ्या देशाची भूमिका मर्यादित ठरते. पाकिस्तानने शस्त्रसंधी वाढविण्याचे आवाहन केले असले, तरी त्याचा कितपत परिणाम होईल, हे अद्याप अनिश्चित आहे. अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनी दिलेल्या प्रतिक्रियेतूनही हीच बाब स्पष्ट होते. त्यांनी सांगितले की चर्चा प्रामाणिकपणे झाली, पण कोणताही ठोस निर्णय झाला नाही. ही भाषा जरी संयत असली तरी तिच्यामागे दडलेला अविश्वास स्पष्टपणे जाणवतो. आजच्या घडीला सर्वांत मोठा प्रश्न असा आहे, की संवाद अपयशी ठरत असेल तर पुढचा मार्ग कोणता? युद्ध हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही; उलट तो विनाशाची दारे उघडतो. त्यामुळे दोन्ही देशांनी हटवादी भूमिका सोडून संयम आणि लवचिकता दाखविणे आवश्यक आहे. इतिहास सांगतो की अहंकार आणि हट्ट यामुळे अनेक संघर्ष पेटले, पण त्यातून कोणालाही दीर्घकालीन लाभ झाला नाही. अमेरिका आणि इराण यांच्यातील सध्याची परिस्थितीही त्याच दिशेने जात असल्याची भीती व्यक्त होत आहे. जर संवादाचा मार्ग कायमचा बंद झाला, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगभर उमटतील. अशावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक सक्रीय भूमिका घेणे गरजेचे आहे.

जागतिक संस्थांनी पुढाकार घेत शांततेचा मार्ग शोधणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दोन्ही देशांनीही परस्पर विश्वासाची नवी वीट रचत संवादासाठी दार उघडे ठेवणे अत्यावश्यक आहे. एकंदरीत २१ तासांची निष्फळ चर्चा हे केवळ राजनैतिक अपयश नसून, भविष्यातील वादळाची चाहूल आहे. शांततेच्या आकाशावर काळे ढग दाटू लागले आहेत. त्यामुळे आता प्रत्येक पाऊल जपून टाकणे गरजेचे आहे. कारण येथे प्रश्न केवळ दोन देशांचा नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्याचा आहे. दुसरीकडे होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या समुद्री मार्गावर नियंत्रण ठेवण्याच्या मुद्द्यावरून निर्माण झालेला वाद हा केवळ प्रादेशिक नव्हे, तर जागतिक आर्थिक हितसंबंधांशी जोडलेला आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी केलेले युद्धविराम वाढविण्याचे आवाहन महत्त्वाचे असले, तरी ते दीर्घकालीन तोडगा ठरू शकत नाही. कारण समस्या केवळ शस्त्रसंधीची नसून, ती विश्वासाच्या अभावाची आहे. संवादासाठी वातावरण निर्माण करणे जितके आवश्यक आहे, तितकेच परस्पर सवलती देण्याची तयारीही महत्त्वाची ठरते. आजच्या घडीला सर्वांत मोठा धोका म्हणजे हा तणाव पुन्हा उफाळून व्यापक संघर्षात परिवर्तित होण्याची शक्यता. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा आणि प्रादेशिक स्थैर्य यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा परिस्थितीत संवादाचे दरवाजे उघडे ठेवणे हीच एकमेव शहाणी भूमिका ठरते. अन्यथा कठोर भूमिकांच्या या संघर्षात शांततेचा आवाज अधिकाधिक क्षीण होत जाईल आणि जग पुन्हा एका नव्या संकटाच्या उंबरठ्यावर उभे राहील.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी किती पुस्तके लिहिली?

## कोणत्या पुस्तकांतून समता, न्याय आणि मानवाधिकार यांचे महत्त्व सांगितले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय समाजव्यवस्थेचे सखोल विश्लेषण करून सामाजिक परिवर्तनाची दिशा देणारे महान विचारवंत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या लेखनकार्याने भारतीय समाज, राजकारण, अर्थशास्त्र आणि धर्म या क्षेत्रांमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. डॉ. आंबेडकरांनी किती पुस्तके लिहिली? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. याचे अचूक एकच उत्तर देणे थोडे कठीण आहे. कारण त्यांनी पुस्तके, संशोधन निबंध, भाषणे, अहवाल आणि लेख अशा विविध स्वरूपात विपुल लेखन केले आहे.

त्यांनी किती पुस्तके लिहिली? डॉ. आंबेडकर यांनी सुमारे १५ ते २० महत्त्वपूर्ण पुस्तके लिहिल्याचे मानले जाते. याशिवाय त्यांच्या लेखनाचा मोठा भाग नंतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : रायटिंग ॲण्ड स्पिचेस' या मालिकेत प्रकाशित करण्यात आला आहे. ज्यात २२ पेक्षा अधिक खंडांचा समावेश आहे. त्यामुळे त्यांच्या एकूण साहित्यसंपदेची व्याप्ती अत्यंत विशाल आहे.

**प्रमुख पुस्तके आणि त्यांचे महत्त्व**

डॉ. आंबेडकर यांच्या काही उल्लेखनीय ग्रंथांनी भारतीय समाजाला नवी दिशा दिली.

**जातिव्यवस्थेचे निर्मूलन**

हे सर्वांत प्रभावी पुस्तक आहे. यामध्ये त्यांनी जातिव्यवस्थेवर कठोर टीका करत तिच्या निर्मूलनाची गरज अधोरेखित केली आहे.

**रुपयाची समस्या**

अर्थव्यवस्थेवर आधारीत हे पुस्तक आहे. या पुस्तकात भारतीय अर्थव्यवस्थेवरील सखोल अभ्यास या पुस्तकातून दिसून येतो.

**शूद्र आणि अस्पृश्यतेवर लेखन**

या पुस्तकात शूद्र पूर्वी कोण होते? हे सांगत शूद्रांच्या उत्पत्तीविषयी ऐतिहासिक आणि सामाजिक विश्लेषण केलेले आहे.

**अस्पृश्यतेच्या उगमाचा शोध**

या पुस्तकात अस्पृश्यतेच्या उगमाचा शोध त्यांनी घेतला आहे. हा सुद्धा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो.

**भाषिक प्रांतरचना**

या पुस्तकात भाषिक प्रांतरचनेवर त्यांनी प्रभावी विचार मांडलेले आहेत. यामध्ये भाषिक प्रांतरचना नेमकी त्या काळी कशी होती, याबद्दल विवेचन केले आहे.

**बुद्ध आणि त्यांचा धम्म**


हा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. धर्म आणि मानवतेचा संदेश याबद्दल प्रभावी लेखन केले आहे.

**लेखनाची वैशिष्ट्ये**

डॉ. आंबेडकर यांच्या लेखनात तर्कशुद्धता, सखोल अभ्यास आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम दिसून येतो. त्यांनी केवळ समस्या मांडल्या नाहीत, तर त्यावर उपाययोजना देखील सुचविल्या. त्यांच्या लिखाणातून समता, न्याय आणि मानवाधिकार यांचे महत्त्व अधोरेखित होते.

**आजच्या काळातील उपयुक्तता**

आजच्या आधुनिक भारतातही त्यांच्या पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. सामाजिक विषमता, आर्थिक असमानता आणि राजकीय प्रश्न यांवर मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या विचारांचा अभ्यास आवश्यक ठरतो. विद्यार्थी, संशोधक आणि धोरणकर्त्यांसाठी त्यांचे लेखन आजही प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली पुस्तके ही केवळ साहित्य नाहीत, तर ती सामाजिक क्रांतीची साधने आहेत. त्यांच्या लेखनातून समाजाला नवी दिशा मिळाली आणि पुढील पिढ्यांसाठी एक भक्कम बौद्धिक वारसा निर्माण झाला.









*अमळनेर : क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त रविवार, दि. १२ एप्रिल रोजी झालेल्या भव्य मॅरेथॉन स्पर्धेचा झेंडा दाखवून प्रारंभ करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, उपनिरीक्षक शरद काकळीज, पोलिस शिपाई विनोद संदानशिव, सिद्धार्थ शिसोदे, पत्रकार किरण पाटील आदी.*

## फुले–आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा

# पुरुषांमध्ये तेजस सपकाळे, महिलांमध्ये उन्नती पाटील प्रथम

## अमळनेरकरांचा मोठा सहभाग; सामाजिक ऐक्य व सुदृढ आरोग्याचा दिला संदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त शहरात रविवार, दि. १२ एप्रिल रोजी सकाळी भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत अमळनेरकरांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून सामाजिक ऐक्य व सुदृढ आरोग्याचा संदेश दिला.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, उपनिरीक्षक शरद काकळीज, पोलिस शिपाई विनोद संदानशिव, सिद्धार्थ शिसोदे, पत्रकार किरण पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या मॅरेथॉन स्पर्धेत युवक, युवती तसेच विविध वयोगटांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पुरुष गटात तेजस सपकाळे (नाशिक) यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. ऋषिकेश वारूडे (नाशिक) यांनी द्वितीय, तर नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव येथील खुमानसिंग ठाकरे यांनी तृतीय क्रमांक मिळवून आपली छाप पाडली. विजेत्यांना अनुक्रमे ७,०००/-, ५,०००/- व ३,०००/- रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले.

महिला गटातही स्पर्धकांनी उल्लेखनीय कामगिरी केली. उन्नती पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळविला. आरती पाटील यांनी द्वितीय, तर ज्योती महाजन यांनी तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना अनुक्रमे ५,०००/-, ३,०००/- व २,०००/- रुपये रोख बक्षीस देण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जयंती महोत्सव समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषदेचे अध्यक्ष तसेच जयंती महोत्सवाचे पदाधिकारी नरेंद्र रामभाऊ संदानशिव, अविनाश संदानशिव, गौतम मोरे, देवदत्त संदानशिव, सुनील वाघ, सुनील करंदीकर, गोपीचंद चव्हाण, राहुल संदानशिव, श्रीचंद चव्हाण, सतीश सोनवणे, ज्ञानेश्वर संदानशिव, गोकुळ बिऱ्हाडे, प्रा. कृष्णा संदानशिव, नितीन संदानशिव, स्वप्नील पाटील, भिका संदानशिव, राजेंद्र संदानशिव, समाधान बिऱ्हाडे, सिद्धार्थ मोरे, दिनेश संदानशिव, जितेश संदानशिव, तुषार संदानशिव, परम चव्हाण, शुभम घोलप, अभिषेक संदानशिव, प्रेम बैसाने, सागर बिऱ्हाडे, सुमेध मोहिते, दीपक सोनवणे, विजय संदानशिव, गणेश ब्रह्मे, काशिनाथ संदानशिव, संदीप संदानशिव, संदीप वाघ, राजरत्न सोनवणे, नाना पाटील आदींनी परिश्रम घेतले. तसेच महिला स्पर्धकांना प्रोत्साहनासाठी चंद्रप्रभाताई नेतकर, नीलिमाताई जाधव, अनिताताई जाधव, किरणताई चव्हाण, वर्षाताई चव्हाण, सुनंदाताई संदानशिव, दीपालीताई संदानशिव, सोनलताई पवार, नितलताई चव्हाण, गौतमीताई चव्हाण आदी उपस्थित होत्या. ही मॅरेथॉन स्पर्धा केवळ क्रीडा उपक्रम न राहता सामाजिक एकात्मता, प्रेरणा आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्याचे प्रभावी माध्यम ठरली.

# सोन्याच्या कणांना वाहून नेणारी नदी कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात नद्यांना त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार ओळखले जाते. भारतात गंगा नदीला माता म्हणून बोलवले जाते. या नदीच्या रेतीत चक्क सोन्याचे कण आढळतात, त्यामुळे तिला एक वैशिष्ट्येपूर्ण नाव मिळाले आहे. या नदीमुळे अनेक लोकांना मालामाल बनवले.

**सोने उगवणारी नदी...**

जगात नद्यांना संस्कृती निर्माण करण्यासह शेतकऱ्यांना मोठा आधार दिला. भारतात गंगा नदीला माता म्हटले जाते. अनेक नद्यांना त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे ओळखले जाते. अशीच एक नदी सोन्या सारख्या अमुल्य धातूच्या उपलब्धतेमुळे ओळखली जाते.

सोने देणाऱ्या या नदीचे नाव सुवर्णरेखा आहे. कारण या नदीच्या पाण्यातील वाळूत सोन्याचे कण सापडतात. ही नदी भारताच्या पूर्वेतून वाहते. या नदीचा उगम झारखंडच्या छोटा नागपूर येथून झाला आहे. इतिहासाच्या काळात या नदीत सोन्याचे अंश सापडत होते. कारण ही नदी खनिजांना समृद्ध क्षेत्रातून वाहते. त्यामुळे येथे सोन्याचे छोटे-छोटे कण आढळतात. या नदीच्या वैशिष्ट्याने तिला प्रसिद्धी दिली आणि सुवर्णरेखा असे तिचे नाव पडले. या नदीचा उगम झारखंडमध्ये झाला. ही नदी पश्चिम बंगाल आणि ओडिशातून वाहत बंगालच्या खाडीला मिळते. ही नदी ज्या क्षेत्रातून येते तेथील खनिज संपत्ती घेऊन ती वाहते. त्यामुळे भौगोलिकदृष्ट्या ही नदी पूर्व भारतातील महत्त्वाची म्हटले जाते. सुवर्ण रेखा नदीच्या रेतीत सोन्याचे छोटे-छोटे कण आढळत होते.

# उन्हाळी वाळवणांचा हंगाम धरतोय जोर

## घराघरांत कुरडया, पापड बनविण्यासाठी महिलांची लगबग; हंगामी गृहोद्योगालाही चालना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण राज्यासह तालुक्यात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. त्यामुळे उन्हाळी वाळवणांचा हंगाम आता जोर धरू लागला आहे. उन्हाळी वाळवणासाठी घरोघरी महिलांची लगबग आता पाहावयास मिळत असून, अंगण, गच्ची आणि ओट्यांवर कुरडया, बटाट्याचे वेफर्स, साबूदाणा कुरडया, सांडगे, पापड आणि फेन्या वाळताना सर्वत्र चित्र दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानाचा महिला पारंपरिक पद्धतीने योग्य वापर करताना दिसून येत आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे आधुनिकतेची छाप जरी दिसत असली, तरी घरगुती चवीच्या वाळवणांचे महत्त्व आजही कायम टिकून आहे. वाळवलेले पदार्थ वर्षभर टिकून राहत असल्याने ग्रामीण भागासह शहरी भागातही या पदार्थांना मोठी मागणी आहे. शहरांमध्ये अंगणाची कमतरता असल्याने महिलांकडून गच्चीवर वाळवण करण्याची पद्धत अधिक लोकप्रिय होत आहे.

दरम्यान, बाजारात तयार पापड, सांडगे, फेन्या आणि कुरडयांना देखील चांगली मागणी आहे. या पार्श्वभूमीवर हंगामी गृहोद्योगाला मोठी चालना मिळत असून, विशेषतः महिला बचत गटांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडत आहे. पारंपरिक समजुतीनुसार चैत्र महिन्यात पापड व सांडगे बनविणे टाळले जाते, तर वैशाखातील तीव्र उष्णतेमुळे कुरड्या व पापड तुटण्याची शक्यता असल्याने महिलांकडून ही वाळवणाची कामे आधीच पूर्ण करण्याकडे कल दिसून येत आहे. अशा प्रकारे उन्हाळा केवळ उष्णतेचा हंगाम न ठरता घरगुती चव, परंपरा आणि स्वावलंबनाचा उत्सव ठरत असल्याचे चित्र तालुक्यात पाहायला मिळत आहे.

# स्व. आशाताई भोसलेंच्या कुटुंबात मोठ-मोठे कलाकार

## एकाने खलनायक म्हणून सिद्ध केले बॉलिवूडवर राज्य



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संगीतसृष्टीतील दिग्गज गायिका दिवंगत आशाताई भोसले यांनी आपल्या आवाजाच्या जोरावर अनेक दशके प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. मात्र त्यांची ओळख केवळ महान गायिका म्हणूनच नाही तर त्यांचे संपूर्ण कुटुंबही बॉलिवूडशी घट्ट जोडलेले आहे.

स्व. आशाताई भोसले यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांनी अभिनय, संगीत आणि इतर क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे हे कुटुंब नेहमीच चर्चेत असते. काही नाती अशी आहेत, की ज्याबद्दल फार कमी लोकांना माहिती असते आणि ती समोर आली की आश्चर्य वाटते.

बॉलिवूडमधील प्रसिद्ध खलनायक शक्ती कपूर यांचा स्व. आशाताई भोसले यांच्या कुटुंबाशी जवळचा संबंध आहे. शक्ती कपूर यांनी आपल्या कारकिर्दीत शेकडो चित्रपटांमध्ये खलनायक आणि विनोदी भूमिका साकारून विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांची पत्नी शिवांगी कोल्हापुरे या स्व. आशाताई भोसले यांच्या भाची (नातेवाईक) आहेत. त्यामुळे शक्ती कपूर हे आशाताईंचे जावई नात्याने जोडले जातात. या कुटुंबातील पुढील पिढीत श्रद्धा कपूर हे एक मोठे नाव आहे.

स्व. आशाताई भोसले यांच्या कुटुंबात संगीत आणि अभिनयाची परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली आहे. या कुटुंबात विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे कलाकार असल्यामुळे ते केवळ प्रतिभेसाठीच नाही तर विविधतेसाठीही ओळखले जाते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे पुनर्स्मरण




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारताच्या सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक इतिहासात अमिट ठसा उमटविणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दरवर्षी १४ एप्रिल रोजी त्यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हा दिवस केवळ एका महान नेत्याच्या जन्माचा स्मरणदिन नसून, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे.

### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

डॉ. आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे झाला. अत्यंत प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत जन्म घेऊनही त्यांनी शिक्षणाच्या बळावर स्वतःचा मार्ग निर्माण केला. त्यांनी कोलंबिया युनिव्हर्सिटी आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे उच्च शिक्षण घेतले. त्यांच्या शैक्षणिक प्रावीण्यामुळे ते अर्थशास्त्र, कायदा आणि राजकारण या क्षेत्रात प्रगल्भ विचारवंत म्हणून उदयास आले.

### सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष

भारतीय समाजातील अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमता याविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा, मंदिर प्रवेश आंदोलन आणि चव्हाट्यावर पाणी पिण्याच्या अधिकारासाठी चळवळी उभारल्या.

### भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

डॉ. आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार मानले जाते. भारतीय राज्यघटना तयार करताना त्यांनी सर्व नागरिकांना समान हक्क आणि न्याय मिळावा यासाठी भक्कम तरतुदी केल्या. मूलभूत अधिकार, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांची त्यांनी प्रभावी मांडणी केली.

### महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विचार

महिलांच्या हक्कांसाठीही त्यांनी मोठे योगदान दिले. कामगार कायदे, महिला हक्क, आणि आर्थिक नियोजन यावर त्यांनी दूरदृष्टीने विचार मांडले. त्यांच्या धोरणांमुळे समाजातील दुर्बल घटकांना बळकटी मिळाली.

### बौद्ध धर्म स्वीकार

१९५६ मध्ये त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. हा निर्णय सामाजिक समतेच्या त्यांच्या विचारांचा परिपाक होता. बौद्ध धर्म स्वीकारून त्यांनी मानवतावादी मूल्यांचा प्रसार केला.

### आजच्या काळातील महत्त्व

आजही डॉ. आंबेडकरांचे विचार समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. जातीय विषमता, सामाजिक अन्याय आणि असमानता यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज आहे. युवकांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन शिक्षण, प्रगती आणि सामाजिक बांधिलकी यांचा स्वीकार करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून, त्यांच्या विचारांचे आत्मसात करण्याची संधी आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून समाजात समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना**
**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे**
**विनम्र अभिवादन!**


# संजू सॅमसनने दाखविला चाहत्याला दिलदारपणा!

## सेल्फी घेणाऱ्याच्या फोनच्या डिस्प्लेवर रेषा पाहिल्या; दिला नवा कोरा मोबाईल गिफ्ट

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

क्रिकेटपटू संजू सॅमसन याने केरळमध्ये एका चाहत्याला नवा मोबाईल भेट देत आपल्यातील दिलदारपणा दाखवून दिला आहे. संजूच्या या कृतीचे कौतुक होत आहे.

टीम इंडियाला टी-२० वर्ल्ड कप विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडणारा संजू सॅमसन स्टार क्रिकेटपटू बनला आहे. संजू सॅमसनला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळून देखील त्याचे पाय अजूनही जमिनीवर आहेत हे दाखवून देणारी एक घटना समोर आली आहे. या घटनेतून संजू सॅमसनकडे असणारी विनम्रता आपल्याला पाहायला मिळते. संजू सॅमसन यंदाच्या आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळतोय. आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये संजूला अपेक्षेप्रमाणे खेळी करता आली नसली तरी तो एका वेगळ्याच कारणामुळे सोशल मीडियावर चर्चेत आहे.






### संजू सॅमसन याने काय केले?

संजू सॅमसन याने एका चाहत्याला मोबाईल भेट देत एक अविस्मरणीय क्षण त्याच्या आयुष्यात निर्माण केला. केरळमधील एका चाहत्याला संजू सॅमसन याने मोबाईल भेट दिला. याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ही घटना पलक्कड जिल्ह्यातील मुंदूर-थुट्टा येथील पंछप्पदम मधील शाळेजवळ हा प्रसंग घडला. या प्रसंगातून संजूच्या साधेपणाचे आणि दयाळूपणाचे दर्शन झाले.

काही रिपोर्टनुसार संजू सॅमसन कोझिकोडे ते कोईम्बतूरला निघाला होता, त्यावेळी तो सायंकाळी ५.१५ वाजता एका फोन कॉलवर बोलत असल्यामुळे थांबला होता. त्याचवेळी शाब्रीश जो केबल तंत्रज्ञ म्हणून कटमपझिप्पुरम येथील होता. त्याच्यासोबत त्याचा मित्र मणिकंडन जवळच्या मंगलकुन्नू येथील मैदानात क्रिकेट खेळण्यासाठी निघाला होता. यावेळी कारमध्ये संजू सॅमसन असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

व्हिडिओ कॉलवर असलेल्या संजू सॅमसनच्या ते दोघे थांबल्याचे लक्षात आले. संजू सॅमसन याने कारच्या बाहेर येत त्यांच्याशी चर्चा केली आणि फोटो काढले. शाब्रीश याने त्याच्या स्वतःच्या फोनवरून सेल्फी काढली. त्याच्या फोनचा डिस्प्ले खराब झालेला होता. हे पाहताच संजू सॅमसन याने कारमध्ये मागील बाजूला असलेला ३० हजार रुपयांचा स्मार्टफोन शाब्रीशला दिला. संजू सॅमसनच्या या कृतीमुळे शाब्रीश आणि त्याचे मित्र अवाक झाले. यानंतर चर्चा करून संजू सॅमसन मार्गस्थ झाला.


संजू सॅमसन याने मोबाईल भेट दिल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असून नेटकऱ्यांकडून संजू सॅमसन याचे कौतुक केले जात आहे. भारताला टी २० वर्ल्ड कप विजय मिळवून देण्यात संजू सॅमसन यांची महत्त्वाची भूमिका होती. संज सॅमसन आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळतो आहे. पहिल्या तीन सामन्यांत मिळून संजू सॅमसन २२ धावा करू शकला आहे. त्याच्या दमदार फलंदाजीची चेन्नई सुपर किंग्जला गरज आहे.

# भारत की इकलौती नदी जिसमें सबसे ज्यादा ऑक्सीजन है

## कहलाती है लाइफलाइन ऑफ इंडिया

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारत देश नदियों का देश है। यहां छोटी-बड़ी मिलाकर ४०० से अधिक नदियां हैं, जिनमें से लगभग २०० मुख्य नदियां देश के विभिन्न हिस्सों में बहती हैं। क्या आप जानते हैं कि भारत की इकलौती नदी कौन सी है जिसमें सबसे ज्यादा ऑक्सीजन है। अगर नहीं तो आज इस सवाल का जवाब जरूर जान लें। यह नदी पांच राज्यों से होकर गुजरती है और लाइफलाइन ऑफ इंडिया कहलाती है।



### भारत नदियों का देश

भारत देश नदियों का देश है। यहां छोटी-बड़ी मिलाकर ४०० से अधिक नदियां हैं, जिनमें से लगभग २०० मुख्य नदियां देश के विभिन्न हिस्सों में बहती हैं।

### सबसे ज्यादा ऑक्सीजन किस नदी में

क्या आप जानते हैं कि भारत की इकलौती नदी कौन सी है जिसमें सबसे ज्यादा ऑक्सीजन है। अगर नहीं तो आज इस सवाल का जवाब जरूर जान लें। यह नदी पांच राज्यों से होकर गुजरती है और लाइफलाइन ऑफ इंडिया कहलाती है।

### गंगा है सही जवाब

यह दावा किया जाता है कि गंगा नदी दुनिया की या देश की ऐसी नदी है जिसमें सबसे ज्यादा ऑक्सीजन पाई जाती है। वैज्ञानिक अध्ययनों और रिपोर्ट्स के आधार पर यह बात काफी हद तक सही मानी जाती है।

### क्या है कारण

दरअसल, कई शोधों में पाया गया है कि गंगा नदी के पानी में घुली ऑक्सीजन का स्तर अन्य नदियों की तुलना में काफी अधिक होता है। कुछ अध्ययनों में यह भी उल्लेख मिलता है कि गंगा में ऑक्सीजन स्तर कई नदियों से कई गुना ज्यादा हो सकता है, जिसका मुख्य कारण इसकी (स्वयं शुद्धिकरण) क्षमता है।

### क्या कहती है रिसर्च

रिसर्च बताती है कि गंगा के कई हिस्सों में Dissolved Oxygen का स्तर ५.८ से ८.९ मि.ग्रॅ./लिटर तक पाया गया है, जो जलीय जीवन के लिए अनुकूल माना जाता है। वहीं भारतीय मानकों के अनुसार ५ मि.ग्रॅ./लिटर से अधिक 'डीओ' स्तर को सुरक्षित माना जाता है।

### विशेष प्रकार के बैक्टीरिया

गंगा के पानी में विशेष प्रकार के बैक्टीरिया और जैव-रासायनिक प्रक्रियाएं मौजूद हैं, जो कार्बनिक कचरे को तेजी से तोड़ देती हैं और पानी में ऑक्सीजन की मात्रा बनाए रखने में मदद करती हैं।

### पांच राज्यों से गुजरने वाली नदी

यही कारण है कि प्रदूषण के बावजूद कई हिस्सों में यह नदी जलीय जीवन को बनाए रखने में सक्षम रहती है। गंगा नदी पांच राज्यों से होकर गुजरने वाली नदी है।

# याला म्हणतात दमदार शेती!

## ही १३ हजार रोपे लावली अन् अनिल झाले थेट १०० कोटींचे मालक

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शेतकरी हा मेहनत, जिद्द आणि चिकाटीसाठी ओळखला जातो. ऊन, वारा आणि पावसाचा सामना करत तो शेती करतो आणि स्वतःसोबत इतरांचेही पोट भरतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या यशोगाथा नेहमीच प्रेरणादायी ठरतात. अशाच एका शेतकऱ्याची सध्या देशभरात चर्चा रंगली आहे. मध्य प्रदेशातील टिकमगड जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने २० एकर शेतीतून तब्बल १०० कोटी रुपयांची कमाई करत सर्वांचे लक्ष वेधले आहे.



### २० एकर शेतीतून १०० कोटींचा चमत्कार

टिकमगड येथील शेतकरी अनिल बडकुल यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर हा अनोखा विक्रम केला आहे. त्यांच्या यशामागे कोणते गुपित आहे, याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. मात्र, हा 'चमत्कार' नसून २० वर्षांच्या नियोजनबद्ध मेहनतीचा परिणाम असल्याचे ते सांगतात. अनिल यांनी पारंपरिक शेतीसोबत सागवानाच्या झाडांची लागवड करण्याचा निर्णय घेतला. सुमारे २० एकर क्षेत्रात लावलेली ही झाडे आज कोट्यवधींची संपत्ती ठरली आहेत.

### १३ हजार सागवान झाडांची संपत्ती

अनिल बडकुल यांनी २००३ ते २०१३ या कालावधीत सुमारे १३ हजार सागवानाची झाडे लावली. या झाडांची किंमत २०२३ पर्यंत १०० कोटी रुपयांहून अधिक झाली होती. ते सांगतात, की प्रगत शेतकरी होण्यासाठी पारंपरिक पद्धतीबाहेर जाऊन विचार करणे आवश्यक आहे. शेतीसोबत वृक्षलागवड केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो.

### बुंदेलखंडचे हवामान ठरले फायदेशीर

सागवान लागवडीसाठी बुंदेलखंड परिसराचे हवामान अत्यंत अनुकूल असल्याचे अनिल सांगतात. त्यामुळे या पिकासाठी मोठा खर्च येत नाही. रोप लावल्यानंतर सुरूवातीची ३ वर्षे विशेष काळजी घ्यावी लागते. त्यानंतर झाडांची वाढ आपोआप होते. योग्य पाणीपुरवठा आणि संरक्षण केल्यास ही झाडे मोठ्या उत्पन्नाचे साधन बनू शकतात.

### २० वर्षांच्या मेहनतीतून 'मातीचे सोने'

'माझ्या २० वर्षांच्या मेहनतीमुळे मातीतून सोने निर्माण झाले,' असे अनिल बडकुल अभिमानाने सांगतात. गेली ३० वर्षे ते शेती करत असून सुरूवातीच्या काळात नफा कमी होता. त्यामुळे काहीतरी वेगळे करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी जाऊन माहिती घेतली आणि २००३ पासून सागवान लागवड सुरू केली. यासाठी शेताला कुंपण घालणे आणि झाडांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आता चंदन लागवडीकडेही वाटचाल

सागवान लागवडीत यश मिळाल्यानंतर अनिल बडकुल यांनी आता चंदनाच्या झाडांची लागवडही सुरू केली आहे. शेतीत सतत तोटा होत असल्याने त्यांनी पर्यायी मार्ग शोधला आणि त्यातूनच हा यशस्वी प्रयोग साकार झाला.

### इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण

अनिल बडकुल यांची ही यशोगाथा देशभरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. पारंपरिक शेतीसोबत नव्या पद्धती स्वीकारल्यास शेतीतूनही कोट्यवधींची कमाई करता येऊ शकते, हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे.



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# भारतातील ‘या’ मंदिरात बंद दरवाज्यामागे होते पूजा

## पुजारीही नाही, मग पूजा कोण करतो? अजूनही सुटललेले नाही कोडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यात असलेला ऐतिहासिक ‘असीरगड किल्ला’ हा केवळ त्याच्या अभेद्य बांधकामासाठीच नाही, तर तेथे घडणाऱ्या एका चमत्कारिक घटनेसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या किल्ल्यात भगवान शिव यांचे एक प्राचीन मंदिर आहे. विशेष म्हणजे दररोज रात्री या मंदिराचे दरवाजे कडक सुरक्षेत बंद केले जातात. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा पुजारी मंदिर उघडतात तेव्हा शिवलिंगावर ताजी फुले आणि चंदनाचा टिळा लावलेला आढळतो. हे रहस्य आजही विज्ञानासाठी एक मोठे आव्हान ठरले असून, स्थानिक लोक याला एका चिरंजीवीच्या भक्तीशी जोडतात. आता हा चिरंजीवी कोण आणि याचा संबंध काय जाणून



घेऊ.

**अश्वत्थामाचा अमरत्वाचा शाप आणि भक्ती**

स्थानिकांच्या मते, महाभारतातील पात्र अश्वत्थामा आजही या मंदिरात पूजेसाठी येतो. ही श्रद्धा स्थानिकांमध्ये दृढ आहे. लोक सांगतात की, किल्ल्याचे दरवाजे सायंकाळी बंद केले जातात आणि सकाळी अकराच्या सुमारास पुन्हा उघडले जातात. या काळात कोणालाही आत प्रवेश करणे जवळजवळ अशक्य असते. पण सकाळी मंदिराचे दरवाजे उघडल्यावर एक आश्चर्यकारक गोष्ट घडलेली दिसून येते. शिवलिंगावर ताजी फुले वाहिलेली असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. आता प्रश्न असा आहे, की आत कोणीही नसताना ही पूजा कोणी केली असेल? हीच गोष्ट या ठिकाणाला रहस्यमय बनवते. हा चमत्कार एकदोनदा घडलेला नसून हे दररोज घडत त्यामुळे इथल्या स्थानिकांची दृढ श्रद्धा अजूनही कायम आहे.

पौराणिक कथेनुसार महाभारतातील गुरु द्रोणाचार्यांचा मुलगा ‘अश्वत्थामा’ याला भगवान श्रीकृष्णाने अमरत्वाचा शाप दिला होता. असे मानले जाते, की अश्वत्थामा आजही जीवंत आहे आणि तो दररोज पहाटे असीरगड किल्ल्यातील या गुढ महादेव मंदिरात शिवपूजेसाठी येतो. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार पहाटे ४ च्या सुमारास मंदिरात कुणीतरी वावरत असल्याचा भास होतो. जेव्हा पहाटेचे पहिले किरण जमिनीवर पडतात, तेव्हा शिवलिंगावर गुलाबाची फुले आणि सुगंधी चंदनाचा लेप लावलेला दिसतो. रात्री मंदिर रिकामे असूनही ही पूजा कोण करते, याचे उत्तर कोणाकडेही नाही.



# परमेश्वर आहे की नाही? यांचे उत्तर खालील माहिती वाचून सापडेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१. कोणत्याही वाहनांचे टायर्स, वापरले की झिजतात. पण आपल्या पायाचे तळवे कधीच झिजत नाहीत.कितीही चाला.तसेच राहतात..

२. आपल्या शरीरात ७५ टक्के पाणी असते.शरिरात लाखो नसा असतात.पण शरिरातून एक थेंबही पाणी कधी लिक होत नाही.

३. कोणतीही वस्तू आधाराशिवाय उभी राहू शकत नाही. पण आपले शरिर मात्र स्वतःचा बॅलेन्स सांभाळून कितीही वेळ उभे राहू शकते.व चालुही शकते.

४. कोणतीही बॅटरी चार्जिंग शिवाय फार काळ चालू शकत नाही. पण आपले हृदय जन्मापासून मृत्युपर्यंत कोणत्याही चार्जिंग शिवाय, न थांबता, अव्याहत धक,धक करत धडकत असते.

५. कोणताही पंप मेंटेनन्स शिवाय सेवा देत नाही.पण आपल्या शरिरातील नसांना जोडलेला पंप कोणत्याही मेंटेनन्स शिवाय, अहोरात्र सुरु राहतो, आणि शरिरभर कायम रक्त संचार सुरु ठेवतो.

६. जगातील कोणत्याही अत्याधुनिक कॅमेऱ्यांत मेगॅपिक्सललाही काही सिमा असते.पण आपले डोळे हजारों मेगापिक्सल च्या अत्युच्च गुणवत्तेने प्रत्येक दृश्य आपल्या कॅमेऱ्यात कैद करु शकतात..

७. कोणतीही प्रयोगशाळा, सर्व चवींची टेस्ट करु शकत नाही.पण आपली जीभ, कोणत्याही उपकरणां शिवाय, हजारों चवी अगदी सहज ओळखू शकते.

८. सगळ्यात ॲडव्हॉन्स् अशा सेंसरलाही एक सीमा असते. पण आपल्या त्वचेला प्रत्येक,सुक्ष्मातील सुक्ष्म संवेदना, किंवा स्पर्श, अगदी सहज जाणवतो.

९. कोणतेही यंत्र सर्व प्रकारचे ध्वनी निर्माण करु शकत नाही. पण आपल्या कंठातून हजारों फ्रीक्वेंसीचे ध्वनी सहजपणे निर्माण होऊ शकतात.

१०. कोणतेही अत्याधुनिक डिव्हाइस,सर्व प्रकारचे ध्वनी डिकोड करु शकत नाही. पण आपले कान आदळणाऱ्या प्रत्येक ध्वनीचा अर्थ समजून सहज डिकोड करु शकतात.

या गोष्टींचा विचार करता खरोखरच परमेश्वर आहे व आपल्याला या अमूल्य बाबी त्याने विनामूल्य दिल्या आहेत. त्यासाठी भगवंताचे आपण आभारच मानायला हवे.आणि त्यामुळेच भगवंताकडे कोणतीही तक्रार करण्याचा आपल्याला काही एक अधिकार नाही.आहे तो फक्त कृतज्ञता व्यक्त करण्याचा अधिकार.

# समर्थ रामदासांनी स्थापन केलेले हनुमानजींचे मंदिर

## बेटावर अकरावे मारुती; रामायणाशीही आहे खास संबंध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील अकरा गावांमध्ये हनुमानजींच्या मंदिरांची स्थापना केली. यापैकीच अकरावे मारुती सांगलीच्या वाळवा तालुक्यातील बहे गावामध्ये आहे. या ठिकाणी प्रसिद्ध असलेली आख्यायिका रामायणाशी संबंधित आहे.

श्री महादेवांचे अकरावे अवतार मानले जाणाऱ्या हनुमानजींचे शक्तीचे प्रतीक म्हणून पूजले जाते. सतराव्या शतकात समर्थ रामदासांनी हनुमानजींच्या पूजेच्या निमित्ताने लोकांमध्ये बलोपासनेची बीजे रुजावीत या हेतूने महाराष्ट्रातील अकरा गावांमध्ये हनुमानजींच्या मंदिरांची स्थापना केली.

बहे गावामध्ये रामलिंग बेट वसलेले आहे. या बेटावर प्रभू श्रीरामांचे प्राचीन मंदिर आहे. तसेच श्रीरामांनी स्थापन केलेले शिवलिंग आहे. यासह अनेक छोटी मंदिरेही आहेत. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात श्रीराम, लक्ष्मण, माता सीता आणि हनुमंतजी यांच्या मूर्ती आहेत. तसेच मागील बाजूस समर्थ रामदासांनी स्थापन केलेली हनुमानजींची मूर्ती आहे. रामलिंग बेटावरील अकराव्या मारुतीविषयी स्थानिक पुजारींनी पुरातन आख्यायिका सांगितली आहे. ती अशी, की रावणाचे निर्दालन करून अयोध्येला परत जाताना प्रभू श्रीरामचंद्र कृष्णा नदीच्या काठी असलेल्या बोरगावला थांबले होते. तेथे कृष्णेच्या वाळवंटात प्रभू श्रीरामचंद्र स्नानसंध्या करायला गेले



असताना कृष्णा नदीला उचंबळून आले आणि त्यामुळे तिला आकस्मिकपणे पूर आला.

मारुतीरायांनी नदीपात्रात मधोमध बसून आपले दोन बाहू आडवे धरून तो प्रवाह आपल्या दोन्ही बाजूंनी प्रवाहित केला. त्यामुळे मध्ये एक बेट तयार झाले.

हनुमंतजींनी दोन बाहूंनी नदीचा प्रवाह विभागला गेला म्हणून बहे किंवा बाहे असे नाव या स्थानाला प्राप्त झाल्याचे मानले जाते. या ठिकाणी मारुतीरायांचे दर्शन घडेल अशा आशेने गेलेल्या समर्थांना मारुतींनी मूर्तीरूपात दर्शन दिले नाही. त्यामुळे समर्थांनी मारुतीरायांचा धावा सुरू केला. त्यावेळी पाठीमागे डोहातून त्यांना हाका ऐकू आल्या. समर्थांनी डोहात बुडी मारून तेथून मारुतीरायांची मूर्ती बाहेर काढली आणि त्याची स्थापना या ठिकाणी केली. या मूर्तीकडे पाहताच समर्थांना एक रचना सुचली. हनुमंतजी पाहावयालागी आलो, दिसेना सखा थोर विस्मीत जालो। तयावीण देवालये ती उदासे, जळातूनी बोभाइला दास दासे।। ही गोष्ट शके १५७३ अर्थात इ.स.१६५२ या वर्षाची. प्राचीन काळापासून येथे श्रीराम मंदिर आणि त्यांच्या पुढ्यात शिवलिंग असे आजही आहे. या श्रीराम मंदिराच्या पाठीमागे मारुतीरायांची स्थापना केलेली आहे. असे आहे मारुतीरायांचे वीररूप मारुतीरायांचे दोन हात पाणी अडविण्याच्या पावित्र्यात दिसतात. दोन्ही मांड्यांच्या बाजूला धरलेले आहेत. डोक्यावर मुकुट असलेली अशी ही भव्य मूर्ती आहे. येथे जाण्यासाठी कृष्णेवरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावर जाणाऱ्या वाटेने जावे लागते. नदीला पूर आल्यावर मात्र ही वाट पूर्ण बंद होते. त्यावेळी येथे जाता येत नाही.



# हनुमानजी ब्रह्मचारी की विवाहित?

## भारतातील एक असे मंदिर जेथे पत्नीसह केली जाते हनुमानजींची पूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संकटमोचन हनुमानजी हे ‘बालब्रह्मचारी’ म्हणून ओळखले जातात. देशभरातील लाखो मंदिरांमध्ये हनुमानजींची मूर्ती एकटी किंवा प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरणांशी असल्याचे आपण पाहतो. मात्र, भारतात एक असे दुर्मिळ आणि एकमेव मंदिर आहे जेथे हनुमानजी बालब्रह्मचारी रूपात नसून चक्क आपल्या ‘पत्नीसह’ विराजमान आहेत.

हनुमानजींनी आपले संपूर्ण आयुष्य प्रभू श्रीरामचंद्रांच्या भक्तीमध्ये समर्पित केले. आपण हनुमानजींना बालब्रह्मचारी मानतो. पण काही धर्मग्रंथांनुसार हनुमानजींचा विवाह झाला असल्याचे म्हटले आहे. काय आहे यामागची नेमकी कथा जाणून घेऊ.

भारतात असे एक मंदिर आहे जेथे महाबली हनुमानजी त्यांच्या पत्नीसह विराजमान आहेत. भक्त त्यांची सपत्नीक पूजा करतात. पण हनुमानजींचे लग्न कधी आणि कोणाशी झाले, आणि लग्न झाले तर मग हनुमानजींना ब्रह्मचारी का म्हटले जाते? असा प्रश्न साहजिकच सर्वांना पडेल.

हनुमानजींचे गुरू सूर्यदेव होते. हनुमानजींनी सूर्यदेवांकडून ९ व्याकरण विद्यांपैकी ५ विद्या आत्मसात केल्या होत्या. परंतु उरलेल्या ४ विद्या केवळ ‘विवाहित’ व्यक्तीलाच शिकविल्या जाऊ शकत होत्या. हनुमानजींना सर्व विद्यांमध्ये पारंगत व्हायचे होते, पण त्यांनी ब्रह्मचर्याची शपथ घेतली होती. असे असताना त्यांना लग्न करणे अनिवार्य होते.

यावर उपाय म्हणून सूर्यदेवांनी आपली कन्या ‘सुवर्चला’ हिच्याशी हनुमानजींचा विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला. सुवर्चला ही ‘तपस्विनी’ होती आणि विवाहानंतरही तिने आपले तप सुरू



ठेवण्याचे ठरविले होते. अशा प्रकारे विवाहाची अट पूर्ण झाली आणि हनुमानजींचे ब्रह्मचर्यही अबाधित राहिले. कारण हा विवाह केवळ ज्ञानप्राप्तीसाठी होता.

आता प्रश्न असा, की भारतात कुठे आहे? असे मंदिर की जेथे हनुमानजींची सपत्नीक पूजा केली जाते. तर हे मंदिर तेलंगणा राज्यातील हैदराबादपासून सुमारे २२० किलोमीटरवरील खम्मम जिल्ह्यात असून, त्याचे नाव ‘श्री सुवर्चला सहिता हनुमानजी मंदिर’ असे आहे.

खम्मम येथील या मंदिरात हनुमानजी आणि सुवर्चला माता यांच्या मूर्ती शेजारी-शेजारी असून त्यांची विधिवत पूजा केली जाते. असे मानले जाते, की ज्या जोडप्यांच्या वैवाहिक आयुष्यात सतत वाद किंवा तणाव असतो, त्यांनी या मंदिरात येऊन जोडीने दर्शन घेतल्यास त्यांचे संबंध सुधारतात.

**(टीप : वरील माहिती सामान्य माहितीवर आधारीत आहे. दै. ‘ग्लोबल महातेज’ याची पुष्टी करत नाही. आमचा उद्देश तुमच्यापर्यंत माहिती पोहोचविण्याचा आहे.)**

# कोकणात वसवली योगी बाबांनी तीन गावे!

## देवीची स्थापना आंजर्ले येथेच का? वाचा ३७३ वर्षांपूर्वीची आख्यायिका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोकणच्या निसर्गसंपन्न कुशीत वसलेल्या आंजर्ले गावात श्रद्धेचा आणि परंपरेचा अपूर्व संगम पाहायला मिळणार आहे. सुमारे ३०० वर्षांहून अधिक काळ जोपासलेला आंजर्लेचा प्रसिद्ध ‘दुर्गादेवी रथोत्सव’ येथे मोठ्या उत्साहात पार पडतो. या सोहळ्यासाठी अवघी आंजर्ले नगरी सज्ज होते.

१६ व्या शतकात एका योगी बाबांनी हे गाव वसविले, अशी आख्यायिका आहे. देवीने दिलेल्या स्वप्नदृष्टांतानुसार सड्यावरील पारदुळे यांच्या परसात हरकिणाच्या राशीत मी आहे. तेथून मला आणून माझी गावात स्थापना कर. त्याप्रमाणे योगी बाबाने शोध घेतला असता गंडकी शिळेची अष्टभुजा महिषासुरमर्दिनी रूपातील देवीची मूर्ती तेथे सापडली. त्यावेळी लहानसे मंदिर बांधून त्यात त्यांनी देवीच्या या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. पुढे शके १६५३ (५ जुले




१७३१) रोजी थोरले बाजीराव पेशवे यांच्या काळात मंदिराचे नूतनीकरण होऊन मंदिराला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले. तोच पेशवेकालीन थाट आजही या उत्सवात अनुभवायला मिळतो.

गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या १८ दिवसांच्या या दुर्गोत्सवांतर्गत रथोत्सवाचा मुख्य दिवस असतो. यामुळे संपूर्ण गावात चैतन्याचे वातावरण असते. घराघरांसमोर आकर्षक रांगोळ्या, घरांवर डुलणाऱ्या पताका आणि रथाच्या मार्गावर घातलेल्या रांगोळ्यांच्या पायघड्यांनी गावाचे सौंदर्य अधिकच खुललेले असते. दुपारच्या सुमारास रथाची विधिवत पूजा झाल्यानंतर देवीचा भव्य रथ भाविकांच्या खांद्यावर विराजमान होऊन ग्रामप्रदक्षिणेसाठी निघतो. या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे आजही येथे ‘बारा बलुतेदार’ पद्धतीचे दर्शन घडते. पेशवेकाळात ठरवून दिलेल्या जबाबदाऱ्यांनुसार प्रत्येक समाज आजही आपली सेवा पूर्ण निष्ठेने देवीच्या चरणी अर्पण करतो. हा रथोत्सव केवळ एक धार्मिक विधी नसून, तो गावातील सामाजिक एकोप्याचे आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारा सोहळा ठरतो.

# सूर्य गोचर मेष राशीत ‘या’ ४ राशींना नोकरी

## व्यवसायात लाभ मिळणार, कमाई वाढणार !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्य गोचर मेष राशीत मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी होणार आहे. मेष राशीत आधीच शुक्र उपस्थित आहे. शुक्र आणि सूर्याच्या युतीने शुक्रादित्य योग निर्माण होणार आहे. अशातच ३० एप्रिल २०२६ रोजी मेष राशीत बुध प्रवेश करेल. ज्यामुळे बुधादित्य योग निर्माण होईल. हा योग अत्यंत प्रभावशाली मानला जातो. यामुळे मेष सहित काही राशींना करिअर,नोकरी व्यवसायात लाभ मिळेल.

यामुळे मेषसहित काही राशींना करिअर, नोकरी-व्यवसाय तसेच सरकारी कामात मोठा लाभ मिळेल. सूर्य आपल्या उच्च राशीत प्रवेश करत असल्याने या राशींच्या लोकांचा समाजात मानसन्मान वाढेल. प्रतिष्ठा मिळेल. सूर्य हा नेतृत्व, आत्मविश्वास, शौर्य, तेज या गुणांचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे यंदा होणाऱ्या सूर्य गोचरमुळे कोणत्या राशींना फायदा मिळणार हे ज्योतिषी राकेश झा यांच्याकडून जाणून घेऊया.

### मेष राशीवर प्रभाव



सूर्य गोचर मेष राशीच्या लग्न भावात होणार आहे. हे गोचर तुमच्या राशीत होत असल्याने याचा मोठा लाभ आणि सकारात्मक परिणाम तुम्हाला पाहायला मिळतील. सूर्य आपल्या उच्च राशीत गोचर करत असल्याने तुमच्या आत्मविश्वासात वाढ होताना दिसेल. कार्यक्षेत्रात संवाद कौशल्याने तुम्ही चांगली मजल माराल. समाजात मानसन्मान आणि प्रसिद्धी मिळेल. प्रेमजीवनात सुख समृद्धी येईल.

### कर्क राशीवर प्रभाव



सूर्य गोचर कर्क राशीच्या दहाव्या भावात होत आहे. हा काळ कर्क राशीच्या लोकांसाठी अत्यंत शुभ आणि सुखद अनुभव देणारा असणार आहे. सूर्याचे गोचर दहाव्या भावात होणार असून, यामुळे तुम्हाला तुमच्या नोकरीत सकारात्मक गोष्टी घडताना दिसतील. प्रमोशन किंवा पगारवाढ होण्याची दाट शक्यता आहे. बॉस आणि सहकाऱ्यांसोबत तुमचे संबंध सुधारतील. व्यापाऱ्यांना देखील विशेष फायदा होताना दिसेल.

### सिंह राशीवर प्रभाव



सूर्य गोचर सिंह राशीच्या नवव्या भावात होणार आहे. हे गोचर तुमच्यासाठी अत्यंत उत्तम असणार आहे कारण सूर्य स्वतःच्या राशीत आहे आणि तो आता उच्च राशीत प्रवेश करेल. या काळात भाग्य तुमची साथ देईल. सरकारी कामात तुम्हाला यश मिळेल. सरकारी नोकरीसाठी प्रयत्नात असाल तर सकारात्मक परिणाम पाहायला मिळतील. करिअरमध्ये चांगल्या संधी मिळतील. आर्थिक स्थिती उत्तम असल्याने तुम्ही प्रसन्न राहाल.

### मकर राशीवर प्रभाव



सूर्य गोचर मकर राशीच्या चौथ्या भावात होणार आहे. हा काळ मकर राशीच्या लोकांसाठी अनुकूल असेल. तुमच्या कामाने बॉस खूश होईल तसेच कार्यक्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याने तुम्हाला पुरस्कार देखील मिळू शकतो. कौटुंबिक मालमत्ता मिळण्याची शक्यता आहे. अचानक धनलाभ होऊ शकतो. करिअरसाठी हे गोचर शुभ असणार आहे. सरकारी कामे अडली असतील तर ती आता वेगाने पुढे जातील. नोकरीत सुद्धा समाधानकारक परिणाम पाहायला मिळतील.